## निशाणी कमांक २३ वरील आदेश

**१.** वादीने प्रस्तुत अर्ज न्यायालयीन आयुक्त नेमण्याकरीता दाखल केलेला आहे.

**२.** वादीचे म्हणणे असे आहे की, मौजे लासरा, ता. कळंब येथील जमीन गट कमांक ९५, क्षेत्र ८० आर पैकी १६ आर क्षेत्राचा कब्जा प्रतिवादीकडून मिळणेबाबत, तसेच ६४ आर क्षेत्रावर प्रतिवादींनी हरकत निर्माण करू नये, म्हणुन प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. वादीने वादग्रस्त जमिनीची मोजणी दिनांक ०६/०३/२०१० रोजी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांचेकडून करून घेतलेली आहे. सदर मोजणीत प्रतिवादीने वादीच्या १६ आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे दिसून आले आहे. म्हणुन अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्याची मागणी वादीने प्रस्तुत दाव्यात केली आहे. प्रतिवादीने त्याच्या जबाब दाव्याच्या परिच्छेद कमांक ७ मध्ये वादी व प्रतिवादीचे जमिनीची संयुक्त मोजणी करून तथाकथित अतिक्रमण आहे किंवा नाही, याची पडताळणी करता येईल, असे नमुद केले आहे.

**३.** प्रतिवादीच्या वतीने सदर अर्जावर लेखी म्हणणे दिले असून प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, वादीने प्रस्तुत अर्ज केवळ वादग्रस्त जमिनीची मोजणी करण्याबाबत दिलेला आहे. प्रतिवादीच्या जमिनीची सुध्दा मोजणी त्यासोबत करण्यात यावी.

**४.** वादी व प्रतिवादीतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे विधीज्ञ श्री. पी.एस. कुलकर्णी यांनी असा युक्तीवाद केला की, दिनांक ०६/०३/२०१०

रोजी वादीने वादजमिनीची मोजणी करून घेतली आहे. परंतु, प्रतिवादीने त्याच्या लेखी जबाबात वरील मोजणी मान्य नसल्याचे कथन केले आहे. म्हणुन, वादीने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. याउलट, प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस.एस. लोमटे यांनी असे विवेचन केले की, वादीच्या म्हणण्याप्रमाणे वादग्रस्त जमिनीची मोजणी यापुर्वीच झालेली आहे. त्यामुळे पुन्हा मोजणी करण्याचे कोणतेही प्रयोजन नाही. म्हणुन, वादीचा अर्ज खारीज करण्यात यावा.

**५.** वादीने दावा दाखल करण्यापूर्वी स्वत: मोजणी करुन तश्या नकाशासह दावा दाखल केलेला आहे. सदर मोजणी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांचेमार्फत करण्यात आल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणात वादीच्या वतीने अदयाप साक्षीपुरावा देण्यात आलेला नाही. वादीला मोजणी नकाशा मोजणीदाराकडून पुराव्यादरम्यान सिध्द करून घेता येईल. दाखल करण्यात आलेल्या मोजणी नकाशाबाबत अदयाप पुरावा देण्यात आलेला नाही. अशा परिस्थितीत, पुन्हा तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांच्यामार्फत वादजागेची मोजणी करणे संयुक्तीक होणार नाही. म्हणुन वादीच्या विनंतीप्रमाणे न्यायालयीन आयुक्त नेमण्याची मागणी मान्य करता येणार नाही. सबब अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे खालील आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

सही/-
(आनंद सो. मुंडे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळंब.

दिनांक :- ०९-०८-२०१६.